# बृहन्मुंबई महानगरपालिका
# रा.ए.स्मा. रुग्णालय, परळ, मुंबई-४०० ०१२
# जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रा.ए.स्मा. रुग्णालयाच्या आस्थापनेवरील मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ (ई.ई.जी. तंत्रज्ञ) या संवर्गातील खालील तक्त्यात नमुद केलेली रिक्त पदे भरण्यासाठी खाली नमुद केलेल्या अर्हता धारण करणा-या व अटींची पुर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**I) अर्ज सादर करण्याचे ठिकाण-**

रा.ए.स्मारक रुग्णालय, (आवक जावक विभाग)
सेठ गो.सु.वै.महाविद्यालय इमारत,
तळमजला,आचार्य दोंदे मार्ग,
परळ, मुंबई-४०००१२.

**II) अर्ज स्विकारण्याची तारीख़** – दिनांक – ०१.१२.२०२० ते १८.१२.२०२०
वेळ - सकाळी ११.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत
(विहित दिनांक व वेळेनंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत तसेच पोस्टाने अथवा स्पीड पोस्टने तसेच कुरीअरने प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत)

**संवर्ग- मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ (ई.ई.जी. तंत्रज्ञ)**
**वेतनश्रेणी- रु. ३५४००-११२४००/- अधिक अनुज्ञेय भत्ते**
**समांतर आरक्षण**

| अ. क्र | प्रवर्गनिहाय आरक्षण | अ जा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमा प्र | इमाव | शै.सा. दु.घ | आ.दु. घ. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सर्वसाधारण | १ | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | **३** |
| | **एकूण** | १ | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | **३** |

**III) पदाची कर्तव्ये-**

१. वॉर्ड तसेच ओपीडी मधील रुग्णांचे ई.ई.जी. काढणे.
२. काढलेल्या ई.ई.जी. चा रेकॉर्ड ठेवणे.
३. वरीष्ठांनी वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे.

**IV) शैक्षणिक अर्हता-**

१. उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा न्युरोटेक्नोलॉजी (Neurotechnology) विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in Paramedical Technology in Neurotechnology) 3 ½ वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा.

## किंवा

२. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदार्थ विज्ञान (B.Sc. in Physics) पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा. ज्या ईईजी केंद्रामध्ये वर्षभरात कमीत कमी 600 EEG चाचण्या केल्या जातात अशा केंद्रामध्ये काम केल्याचा 6 महिन्याचा अनुभव असावा.

३. उमेदवारास महापालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**४.** उमेदवारांस डी.ओ.ई.ए.सी.सी सोसायटीचे (सी.सी.सी) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी किंवा जी.ई.सी.टी. प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एमएससीआयटी ची परिक्षा नेमणुकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**५.** उमेदवार माध्यमिक शांलात प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान ५० गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे

**वयोमर्यादा-** खुल्या प्रवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवाराचे वय दि.०१.१२.२०२० रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये. मागास प्रवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवारांचे वय ४३ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये. अगोदरच मुंबई महानगरपालिका सेवेत असल्यास उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा नाही.

**V) निवडीचे निकष –**

१. **मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ (ई.ई.जी. तंत्रज्ञ) या पदाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार** 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा न्युरोटेक्नोलॉजी (Neurotechnology) विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in Paramedical Technology in Neurotechnology) पूर्णवेळ पदवी परीक्षेच्या **किंवा** मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदार्थ विज्ञान (B.Sc. in Physics) हा एकच प्रमुख विषय (Major Subject) घेऊन पदवी परीक्षा अंतिम वर्षाच्या गुणांच्या अंतिम वर्षाच्या गुणांच्या टक्केवारीनुसार उमेदवारांची व्यवसाय चाचणीकरीता निवड यादी तयार करण्यात येईल. व्यवसाय चाचणी उत्तीर्ण उमेदवारांची गुणवत्तेनुसार अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल व अंतिम निवड यादी प्रसुत करण्यात येईल.

**२. उमेदवाराने पदवी दुस-या किंवा तिस-या प्रयत्नात उत्तीर्ण केली असल्यास पदवी परीक्षेत मिळवलेल्या अंतिम गुणांमधुन अनुक्रमे १ व २ टक्के गूण वजा केले जातील.**

३. अंतिम पदवी परीक्षा 3 पेक्षा जास्त प्रयत्नात (Attempt) उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांचा **मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ (ई.ई.जी. तंत्रज्ञ)**पदासाठी विचार केला जाणार नाही.

४. पदवी परीक्षेत समान टक्केवारी असेल तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या तारखांनुसार प्राधान्य देण्यात येईल.

५. समान गुण धारण करणा-या उमेदवाराना जन्म तारखेनुसार वयोजेष्ठतेने प्राधान्या देण्यात येईल.

**VI) निवडीची कार्यपध्दती** :

१) उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची खुल्या प्रवर्गाचे उमेदवार म्हणून निवड करण्यात येईल. मागास प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरिता अर्ज करण्याची मुभा राहील.

२) खुल्या प्रवर्गाच्या पदांसाठी निवड झालेली असेल अशा उच्च गुणवत्ताधारक मागास प्रवर्गातील उमेदवारांची खुल्या प्रवर्गात नेमणूक करण्यात येईल.

३) अर्जाची पडताळणी करून ज्या उमेदवारांची कागदपत्रे योग्य व परिपूर्ण असतील अशा उमेदवारांची व्यवसाय चाचणी घेण्याकरिता नावे, दिनांक व वेळ स्थानिक सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

४) भरती प्रक्रीया पूर्ण झाल्यावर सामाईक गुणवत्ता यादी (Combined Merit list ) प्रसृत करण्यात येईल.

## VII) खालीलप्रमाणे प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**अ) शैक्षणिक अर्हता- एकूण गूण ४०**

| अ.क्र. | या पदाकरीता आवश्यक पात्रता | टक्केवारी निहाय गूणांचा तपशील (एकूण गूण ४०) |
|---|---|---|
| १ | उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा न्युरोटेक्नोलॉजी (Neurotechnology) विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in Paramedical Technology in Neurotechnology) 3 ½ वर्षाचा पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाचे गूण् | ५० % किंवा त्यापेक्षा अधिक - २० गूण |
| | | ६० % किंवा त्यापेक्षा अधिक -३० गूण |
| | | ७० % किंवा त्यापेक्षा अधिक - ४० गूण |
| २ | उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदार्थ विज्ञान (B.Sc. in Physics) पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा. ज्या ईईजी केंद्रामध्ये वर्षभरात कमीत कमी 600 EEG चाचण्या केल्या जातात अशा केंद्रामध्ये काम केल्याचा 6 महिन्याचा अनुभव असावा. | ५० % किंवा त्यापेक्षा अधिक - २० गूण |
| | | ६० % किंवा त्यापेक्षा अधिक -३० गूण |
| | | ७० % किंवा त्यापेक्षा अधिक - ४० गूण |

**ब) अनुभव – एकूण गूण- २०**

**१.** या क्षेत्रात काम करण्याचा ५ वर्षाचा अनुभव - **५ गूण**

२. ५ वर्षापेक्षा अधिक अनुभवासाठी अतिरिक्त - **५ गूण**

३. Intra Oprative EEG, ECOG monitorin काम केल्याचा अनुभव – **५ गूण**

४. अर्जदार Epilepsy, Surgery unit मध्ये प्रशिक्षण घेतलेले असल्यास किंवा Botox Injection देण्याचा अनुभव असल्यास -**५ गूण**

(उपरोक्त सर्व अनुभवांबाबत प्रमाणपत्र आवश्यक आहे. प्रमाणपत्र नसल्यास कोणतेही गूण दिले जाणार नाहीत.)

**क) व्यवसाय चाचणी- एकूण गूण- ४०**

उमेदवाराने अर्जसह सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्राच्या आधारे अर्हतेचे ४० गूण व अनुभवाचे २० गूण अशा एकूण ६० गुणांपैकी उमेदवारास मिळालेल्या एकूण गूणांप्रमाणे उच्च गुणवत्ता धारक पात्र उमेदवारांची व्यवसाय चाचणी घेण्यात येईल.

शैक्षणिक अर्हतेचे ४० गूण व अनुभवाचे २० गूण अधिक व्यवसाय चाचणीचे ४० गूण अशा एकूण १०० गुणांपैकी उमेदवाराने मिळवलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

व्यवसाय चाचणी घेण्याकरीता नावे, दिनांक व वेळ स्वतंत्रपणे सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

उपरोक्त बाबतीत आवश्यकता भासल्यास आवश्यक ते बदल प्रशासनाकडून करण्यात येतील. आवश्यक असल्यास भरती प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून कधीही थांबविली किंवा पुढे ढकलली जाऊ शकते.

**VIII) सर्वसाधारण अटी –**

१. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणुका करण्यात येतील. तथापि, निवड यादी कोणत्याही वेळेस पूर्व-सुचना न देता रद्द करण्याचे अथवा वाढविण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

२. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या आणि अनुशेष यात बदल होऊ शकतो. यास्तव, प्रत्येक पदाच्या बदल झालेल्या रिक्त पदानुसार गुणवत्ता यादीतून उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडे राहातील.

३. उमेदवाराचा विहित नमुन्यातील अर्ज स्वहस्ताक्षरात व सर्व दृष्टीने पूर्ण असावा. मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिन-कोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा. **विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाही.**

**४.** अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याला भरतीकरिता अर्ज करावयाचा असेल तर त्याने/तिने त्याच्या/तिच्या खाते प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्ज सादर करण्यापूर्वी अथवा प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

५. अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या तीन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराने स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.

६. **अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणाऱ्या) ए-४ आकारातील असावे. स्पीड पोस्ट अथवा टपालाने प्राप्त झालेले अर्ज भरतीप्रक्रियेकरिता विचारात घेतले जाणार नाहीत. उमेदवाराने कागदपत्रे पडताळणीच्यावेळी स्वत; उपस्थित राहणे आवश्यक आहे.**

७. उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची

उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

८. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरित झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरिता विचार केला जाणार नाही.

९. उमेदवांराने नियुक्तीपूर्वी खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रे/कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच त्याच्या छायांकित प्रती तपासणीसाठी नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करणे आवश्यक आहे.

अ) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मदाखला/अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),

आ) माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.)व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (एच.एस.सी.) यांच्या गुणपत्रिका व उत्तीर्णतेची प्रमाणपत्रे, गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे,

इ) पदवी परीक्षेच्या सर्व सत्र/वर्षाच्या गुणपत्रिका, उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे. तथापि पदवी परीक्षेची मुळ गुणपत्रिका पुढील अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अथवा महाविद्यालय यांच्याकडे सुपुर्द केली असल्यास त्याबाबतचे संबंधित विद्यापीठ/महाविद्यालय यांच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र व त्यांनीच साक्षांकित केलेली पदवी परीक्षेची छायांकित गुणपत्रिका आणणे आवश्यक आहे,

ई) पदवी परीक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नांत उत्तीर्ण झालेले असल्यास प्रत्येक प्रयत्नांची गुणपत्रिका व एकूण प्रयत्नांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे,

उ) सर्व मागासप्रवर्गाच्या उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे अलीकडील प्रमाणपत्र (latest Non Creamy-layer Certificate) नियुक्ती पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. तथापी, मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांकडे नियुक्तीच्या वेळी जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन निर्णय क्र.बीसीसी/२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ बी दि. १२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेला संबधित उमेदवार नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकेल. मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्ती झाली असल्यास जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून त्यास तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. तथापी, नियुक्तीनंतर एक महिन्याच्या आत उमेदवारांने संबधित पडताळणी समितीकडे दावा दाखल करून त्याबाबतची पोहोचपावती नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक आहे,

ऊ) उमेदवार सरकारी, निम-सरकारी किंवा खाजगी नोकरीत असल्यास नियोक्त्याचे (Employer) ना-हरकत प्रमाणपत्र,

ऋ) विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नावात बदल झाल्याबाबतचे

राजपत्र सादर करणे आवश्यक आहे, तसेच ते नसल्यास लग्नापूर्वीच्या नावाने सुध्दा अर्ज करु शकतात.

१०. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यामध्ये शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवारांविरुद्ध पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

११. निवड झालेल्या उमेदवाराची संबंधित पदावर नियुक्ती करण्यापूर्वी उमेदवाराला सदर पदाच्या एक महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल किंवा तशा आशयाचे बंधपत्र (Bond) सादर करावे लागेल. सदर भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारास बिनव्याजी परत मिळेल. उमेदवाराने सुरक्षा अनामत रक्कम भरुनसुद्धा मनपामध्ये नेमणूक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत काही कारणास्तव बडतर्फ केल्यास त्यांना, त्यांनी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळण्याचा हक्क राहाणार नाही.

१२. रिक्त पदांच्या तुलनेत जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास उमेदवारांचया शैक्षणिक अर्हतेतील गुणवत्तेनुसार कपात यादी तयार करण्यात येऊन, त्यानुसार उमेदवारांना व्यवसाय चाचणी परीक्षेस बोलविण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

१३. उमेदवारांना व्यवसाय चाचणी परीक्षेसाठी नियोजित स्थळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१४. निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार पाळ्यांमध्येही (Shift duties) काम करावे लागेल.

१५. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याला सेवेतून कमी करण्यात येईल.

१६. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

१७. निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्त्वावर नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, १९९९ लागू होतील. तसेच शासन निर्णय क्र. अंनियो/१००५/१२६/सेवा-४ दि. ३१.१०.२००५ अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल.सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजेच मुंबई महानगर पालिका निवृत्तीवेतन नियम १९५३ आणि सध्या अस्तित्त्वात असलेली भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१८. सदर भरती-अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी (नैमित्तिक रजा सोडून अन्य कोणत्याही रजेचा/अनुपस्थितीचा कालावधी वगळून) असेल व तीन वर्षानंतरचे सेवा-सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

१९. शासन निर्णय क्र. संकिर्ण/२००७/पडताळणी/नवि-२६ दि. २१.११.२००७ अन्वये, निवड झालेल्या उमेदवारांविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य-प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची/तिची सदर पदावर नेमणूक केली जाईल. तसेच शासन परिपत्रक क्र.याचिका-३०१३/प्र.क्र.१२० नवि मंत्रालय दि.१९.११.२०१४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार निवड झालेल्या उमेदवाराने संबंधित पोलिस स्टेशन कडून चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर नियुक्ती देण्यात येईल.

२०. निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी मनपा वैद्यकीय परीक्षक यांच्या मार्फत करण्यात येईल. व त्यांनी नोकरीस पात्र ठरविल्यानंतर त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

२१. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनिं महापालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही.

२२. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र असावे.

२३. उमेदवारांना कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२४. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.

२५. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.

२६. तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यंत; या दोन्हीपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राहय असेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. तथापी,सदर विधीग्राहय कालावधी मध्ये बदल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांकडे राहतील.

२७. काही अपरिहार्य कारणास्तव तारखांमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२८. उमेदवाराने या भरतीप्रक्रिये संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया वरील वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

२९. निवड प्रक्रियेत कोणत्याही स्तरावर निर्णय घेण्याचे अंतिम अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.

**IX) अर्ज सादर करण्याची पध्दत**

पात्रता निकषाची पुर्तता करण्या-या उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह जाहिरातीतील नमुद केलेल्या ठिकाणी सादर करण्यात करण्यात याव्यात. पोस्टाने अथवा कुरीअर ने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**X) विशेष सूचना** -

१. यापूर्वी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
२. सेवायोजन कार्यालय प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
३. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
४. मध्यस्थ/ठग/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहाण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.
५. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना आहेत.

सही/-

**अतिरिक्त आयुक्त**

(पश्चिम उपनगरे)

उमेदवारांने त्यांचे अलिकडे काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी.
2.5 सेमी x 3 सेमी

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## अर्जाचा नमुना

**पदाचे नाव** – मस्तिष्क आलेख तंत्रज्ञ (ई.ई.जी. तंत्रज्ञ)

प्रति,
**अधिष्ठाता,**
**रा.ए.स्मा.रुग्णालय, परळ, मुंबई-४०० ०१२**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यामध्ये वर नमुद केलेल्या पदाकरीता दि. . .२०२० च्या जाहिराती नुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज सादर करीत आहे.

१. (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) मराठीत –______________________________________
______________________________________

(ब) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नाव –______________________________________

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता) –______________________________

२. (अ) पत्ता (पोस्टल पिनकोड सह).______________________________________
______________________________________
______________________________________

(ब) दूरध्वनी क्र. [ ] भ्रमणध्वनी क्र. [ ]

(क) ई-मेल- [ ]

३. लिंग – पुरुष - [ ] स्त्री – [ ]

४. जात:________________ पोटजात: ________________

अर्ज सादर करावयाचा प्रवर्ग : [ ] (अजा/इमाव/खुला)

५. जात वैधता प्रमाणपत्र आहे का ? होय / नाही [ ]

(असल्यास छायांकित प्रत सोबत जोडावी. )

६. उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत आहे का ? होय / नाही [ ]

(असल्यास छायांकित प्रत सोबत जोडावी.

७. (अ) जन्मदिनांक - [ ] / [ ] / [ ]

(ब) वय- दि.०१.१२.२०२० रोजी वय वर्ष महिने दिवस

८. शैक्षणिक अर्हता –

| शैक्षणीक अर्हता | विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परिक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा न्युरोटेक्नोलॉजी (Neurotechnology) विषयातील बी.पी.एम.टी. (Bachelor in Paramedical Technology in Neurotechnology) पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रम | | | | | | | |
| बी.एससी. (पदार्थविज्ञान) B.SC. (PHYSICS) ALL SEMISTER | | | | | - | - | |

[बीपीएमटी व बी.एस.सी. (पदार्थविज्ञान) पदवीच्या सर्व वर्षाच्या/सत्रांच्या गुणपत्रिका तसेच ATTEMPT CERTIFICATE जोडणे आवश्यक आहे.]

९. संगणक विषयक ज्ञान- MSCIT किवा शासनाने विहित केलेल्या संगणकविषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र – आहे/नाही (असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडावे)

१०. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र तत्सम उच्चतम परीक्षेत किमान ५० गुणांची प्रश्नपत्रिक असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण आहे- आहे/नाही (असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडावे)

११. अनुभव-

अ) ई.ई.जी. तंत्रज्ञ या क्षेत्रात काम करण्याचा अनुभव किती वर्ष- ____________________
(असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडावे)

आ) Intra Oprative EEG, ECOG monitorin काम केल्याचा अनुभव आहे का- ________________
(असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडावे)

इ) Epilepsy, Surgery unit मध्ये प्रशिक्षण घेतलेले असल्यास किंवा Botox Injection देण्याचा अनुभव आहे का - _______________ (असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडावे)

१२. स्थानिक पोलीस ठाण्याचा संपूर्ण पत्ता -____________________________________________________
____________________________________________________
____________________________________________________

१३.उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही, असल्यास त्याबाबतचा तपशील- ____________________
____________________________________________________________________________
(असल्यास त्याबाबतचा तपशील देवून सध्याच्या नियोक्त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडावे.)

१४. अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? होय / नाही

ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.____________________________________________

१५. उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेचा कर्मचारी आहे का- होय/नाही.

अ. उमेदवाराविरुध्द खात्यांतर्गत चौकशी प्रलंबित वा प्रस्तावित आहे का- होय/नाही

आ. असल्यास तपशील द्यावा.

इ. कर्मचारी महानगरपालिकेच्या सेवानिवासस्थानात राहत आहे का-
(राहत असल्यास विनाभाडे किंवा सवलत भाडे तपशील देणे तसेच सेवा निवासस्थानाचा पूर्ण पत्ता द्यावा)

## लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र (नमुना अ)

मी श्री/श्रीमती/कुमारी______________________________________________________________
श्री._______________________________________________यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय-____ वर्ष, राहणार____________________________________________________________________________
____________________________________________________________________________
याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी __________________________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ___________ (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या _________ आहे. (असल्यास जन्मदिनाक नमुद करावा.)

३. हयात असलेली मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही

(नाव- )

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्व असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी ____________________ पदाकरीता पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त् दिलेल्या

माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतून कमी केल्यास त्याबाबत माझी काही तक्रार राहणार नाही. अर्जाद्वारे दिलेली माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई करु शकते याची मला जाणीव आहे.

दिनांक : **आपला/आपली विश्वासू**

ठिकाण :

सोबत-

१.

२.

३.

४.